# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव
## (जिल्हा सेतू सोसायटी शाखा)

दुरध्वनी क्रमांक:-०२५७-२२३९५०१ ई-मेल:- dssjalgaon@gmail.com

क्र.सेतू/कावि/२०२१/५१/६६/९८५ दि. १४/१०/२०२१

**दरपत्रक सुचना**

मा. जिल्हाधिकारी यांचे शासकीय निवासस्थानाचा दुरध्वनी क्र.०२५७२२६०४०१ या वर मा.जिल्हाधिकारी महोदयांना कायदा व सुव्यवस्था, नैसर्गिक आपत्ती सारख्या अतितातडीच्या कामकाजासाठी व नियमित प्रशासकीय कामकाजाच्या अनुषंगाने क्षेत्रिय यंत्रणांशी संपर्क साधणेसाठी दुरध्वनी आवश्यक आहे. सदर दुरध्वनी यंत्रणा हा खराब झालेला असून अद्यावत अंतर्गत दुरध्वनी EPBX यंत्रणा, वायरिंग व फोनसेट हे तांत्रिक साहित्य खालील प्रमाणे पुरविणे बाबत याव्दारे दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| ठिकाण | साहित्य | तपशील |
|---|---|---|
| मा. जिल्हाधिकारी जळगांव यांचे शासकीय निवासस्थान, जळगांव शहर | दुरध्वनी क्र.०२५७२२६०४०१ | अद्यावत अंतर्गत दुरध्वनी EPBX यंत्रणा, वायरिंग व फोनसेट |

सदरचे तांत्रिक साहित्य हे आपणास मा. जिल्हाधिकारी जळगांव यांचे निवासस्थान येथे Install व कार्यान्वित करुन देणे आवश्यक राहील. सदरचे साहित्य पुरवठा करावयाचा असल्यास एकुण सर्व करासहीत खर्च धरुन आपले दरपत्रक लेटर हेडवर सिलबंद पाकीटात कार्यालयीन वेळेत दि. २५/१०/२०२१ पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत सेतू शाखेत समक्ष देण्यात यावे.

तरी वरील साहित्याचा पुरवठा करावयाचा असल्यास आपल्या दुकानाचे दरपत्रक वर नमुद केल्याप्रमाणे विहीत कालावधीत सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त होणारे दरपत्रक स्विकारले जाणार नाही. याबाबतची कृपया नोंद घेण्यात यावी.

सदर साहिल्याचा पुरवठा करावयाचा असल्यास दरपत्रका सोबत खालील कागदपत्रांची प्रत सादर करणे आवश्यक राहील.

१.संस्थेचे प्रमाणपत्र (दुकान नोंदणी प्रमाणपत्राची प्रत).
२.GST रजिस्ट्रेशन क्रमांक व पॅन कार्डची प्रत.
३.अधिकृत विक्रेता असल्याबाबतची प्रत.

**अटी व शर्ती**

४. दुरुस्ती/साहित्य पुरवठा करण्याचा आदेश मिळालेपासून सात दिवसात पुरवठा न झाल्यास रु. ५०/- या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
५. दरपत्रकात दुरुस्ती/साहित्याचा दर्जा व प्रमाण यामध्ये तफावत आढळल्यास मा. जिल्हाधिकारी निर्णय देतील तो अंतीम व निविदाकारकावर बंधनकारक राहील.
६. दरपत्रक बाबतची खरेदीची प्रक्रिया स्विकारणे किंवा रद्द करणे याबाबतचा मा. जिल्हाधिकारी जळगांव यांचा निर्णय अंतीम राहील.

**(अभिजीत राऊत)**
**अध्यक्ष जिल्हा सेतू सोसायटी**
**तथा जिल्हाधिकारी जळगांव**

**प्रत :**१)जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जळगांव यांनी उक्त दरपत्रक निविदा सूचना www.jalgaon.gov.in या जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस सादर करावा.

२)शिपाई, सामान्य शाखा जि. का. जळगांव यांनी उक्त दरपत्रक निविदा सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.